# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:09.05.2026** **वार: शनिवार**

1. एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामं युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
2. परभणी जिल्ह्यातील शंभर वर्षांहून अधिक काळ बंद असलेला असोला-मुरुंबा रिंगण हा पाणंद रस्ता मोकळा
3. इयत्ता दहावीच्या परीक्षेत 97 पूर्णांक 62 टक्के निकालासह कोकण विभाग राज्यात अव्वल
4. 'पॉश' कायद्याची राज्यभर सक्तीनं अंमलबजावणी करण्याचे आदेश आणि
5. राज्यातील काही भागात वादळी वाऱ्यांससह पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा इशारा

**जलसंधारण आढावा-मुख्यमंत्री**

राज्यातील जलसंधारण तसंच जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काल वर्षा निवासस्थानी आढावा घेतला. एल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी पाउसमान कमी होण्याची शक्यता गृहीत धरून, जलसंधारण तसंच जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत असलेली कामं युद्धपातळीवर पूर्ण करावीत; तसंच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्यानं कामं करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामं पूर्ण करून घ्यावीत असं त्यांनी सांगितलं. जलयुक्त शिवार 2 अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामं आराखड्यात समाविष्ट करून तातडीनं पूर्ण करावीत तसंच, जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे 15 मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत असे निर्देशही फडणवीस यांनी दिले.

**परभणी-पाणंद रस्ता-परभणी**

परभणी जिल्ह्यातील शंभर वर्षांहून अधिक काळ बंद असलेला, असोला–मुरुंबा रिंगण हा पाणंद रस्ता खुले करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जयसिंह चव्हाण यांनी काल दिले. हा रस्ता खुला झाल्यामुळं ग्रामस्थांची दीर्घकालीन अडचण दूर होऊन वाहतूक, शेतीमालाची ने-आण आणि दैनंदिन दळणवळणासाठी मोठी सुविधा निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या या कार्यवाहीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केलं आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, विविध स्तरांवरील दबावांना सामोरं जात आणि मर्यादित साधनस्रोतांमध्ये समन्वय साधून ही कार्यवाही यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

**दहावी निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारीत घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल काल जाहीर करण्यात आला. राज्यात यावेळी एकंदर 92 पूर्णांक 9 शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ऐकुया या निकालाची काही वैशिष्ट्ये..

**या वर्षी राज्याचा दहावीचा एकंदर निकाल 92 पूर्णांक 9 शतांश टक्के लागला असून, कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक, 97 पूर्णांक 62 टक्के आहे, तर सर्वांत कामी निकाल छत्रपती संभाजी नगर विभागाचा, 88 पूर्णांक 41 शतांश टक्के लागला. राज्यात या परीक्षेसाठी एकंदर 16 लाख 164 अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी 14 लाख 20 हजार 486 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी उत्तीर्ण झालेल्यांमध्ये 2 पूर्णांक 1 शतांश टक्क्यांची घट दिसून आली. यंदा 179 विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण मिळवून विशेष यश संपादन केलं आहे. त्यामध्ये सर्वाधिक 104 विद्यार्थी लातूर विभागातील आहेत. उत्तीर्ण होण्याच्या प्रमाणात यंदा देखील मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचं**

**उत्तीर्ण होण्याचं प्रमाण 94 पूर्णांक 96 टक्के आहे, तर, 89 पूर्णांक 56 टक्के मुलं परीक्षेत उत्तीर्ण झाली. विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी आजपासून 23 मे पर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.**

**पश्चिम बंगाल/तमिळनाडू**

पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांची निवड केल्याची घोषणा भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केली. नवनिर्वाचित मंत्रिमंडळाचा आज कोलकात्यामध्ये शपथविधी होणार आहे.

तमिळनाडूमध्ये, TVK प्रमुख सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्याबाबतची अनिश्चितता अद्यापही कायम आहे. सरकार स्थापनेसाठी TVK ला पाठिंबा देणार असल्याच्या वृत्तांचं IUML नं खंडन केल्यानंतर पेच वाढला आहे.

**झोपडपट्टी अधिनियम**

मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला, 'महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, 1971' अंतर्गत झालेल्या कामाचं लेखापरीक्षण करण्यासाठी, चार आठवड्यांच्या आत एक उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. या कामात झालेल्या दिरंगाईबद्दल न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठानं नाराजी व्यक्त केली.

**तक्रार समिती**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाला आळा घालण्यासाठी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम अर्थात, 'पॉश' कायद्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व शासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये, अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणं आणि तिची नोंद केंद्र शासनाच्या 'शी-बॉक्स' पोर्टलवर करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. नियमांचं पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखावर 50 हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असून, पुनरावृत्ती झाल्यास दुप्पट दंड अथवा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास विभागाचे आयुक्त जगदिश मिनियार यांनी दिली आहे.

**नैसर्गिक शेती**

रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे बिघडलेलं जमिनीचं आरोग्य, हवामानातील बदल, पाण्याची प्रत याचा परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होत आहे. जमिनीचं आरोग्य सुधारण्यासाठी तसंच शेती शाश्वत करण्यासाठी पुण्यात माननीय राज्यपालांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात प्रथमच नैसर्गिक शेतीवर भव्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नैसर्गिक शेतीसाठी निविष्ठा शेतावरच तयार करण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठानं तयार केलेलं एकात्मिक शेती पद्धतीचं मॉडेल फलदायी ठरेल असं मत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विलास खर्चे यांनी व्यक्त केलं. विद्यापीठासोबत कृषी विभाग आणि आत्मा यांच्याद्वारे ही कार्यशाळा घेण्यात आली. आत्माचे संचालक सुनील बोरकर यांनी या कार्यशाळेत उपस्थित शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या प्रयोगाची इतरांना माहिती द्यावी, प्रत्येकानं 30 ते 40 शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसंबंधी ज्ञान द्यावं असा सल्ला दिला. नैसर्गिक शेती करणारे दीड हजार शेतकरी कार्यशाळेला उपस्थित होते.

**आकाशवाणी-मॅरेथॉन**

आकाशवाणीच्या 90व्या स्थापना दिनानिमित्त काल, दिल्लीसह विविध शहरातील आकाशवाणी केंद्रांतर्फे दौड किंवा पदफेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. दिल्ली इथं प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी आणि आकाशवाणीचे महासंचालक राजीव कुमार जैन याप्रसंगी उपस्थित होते.

आकाशवाणी पुणे केंद्रातर्फे, केंद्र कार्यालयापासून शनिवारवाड्यापर्यंत पदफेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. 'चला, वारसा आणि आरोग्य यांचा मेळ घालूया' ही पदफेरीची मध्यवर्ती संकल्पना होती. या पदफेरीत केंद्रातील विविध विभागांचे स्थायी आणि अस्थायी कर्मचारी सहभागी झाले होते.

आकाशवाणीच्या 90 वर्ष पूर्तीनिमित्त, सांगली आकाशवाणी केंद्राच्या वतीनं आज सुगम गीतांच्या मैफिलीचं आयोजन करण्यात आलं आहे. हा कार्यक्रम लट्ठे एज्युकेशन सोसायटीच्या केशवराव चौगुले सभागृहात आज सायंकाळी सहा वाजता होणार आहे.

**अंमली पदार्थ-लातूर**

लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणी आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून 45 गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेले 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे अंमली पदार्थ काल कायदेशीर आणि शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले. यामध्ये 713 किलो गांजा, 21 किलो अफू आणि 96 ग्रॅम एमडी ड्रग्जचा समावेश होता.

**पाऊस**

सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुक्यात काल दुपारी वीजांसह पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता.

नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळमध्ये काल दुपारी मुसळधार पावसासोबतच जोरदार गारपीट झाली. या पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी, परिसरातील शेतपिकांचं नुकसान झाल्याची भीती व्यक्त होत आहे.

लातूर जिल्ह्यातील उदगीर शहरासह, रेणापूर तालुक्यात काल सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. तर जळकोट तालुक्यात शिवाजीनगर तांडा, वाघमारी तांडा आणि गव्हाण परिसरातील 3 गावं आणि एका वाडीला दोन शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता असून, कोकणात हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.